# स्वारातीम विद्यापीठाचा अॅथलेटिक्स संघ मेंगलोरला रवाना

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा अॅथलेटिक्सचा (मुले) संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी मेंगलोरला (कर्नाटक) रवाना झाला. संघ विविध मार्ग व मैदानी क्रीडा प्रकारात सहभागी होणार आहे.

स्वारातीम विद्यापीठ नांदेडने खेळ संस्कृती जतन करण्यावर भर दिला आहे. नुकतेच पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन विद्यापीठाने इनडोअर हॉलमध्ये दिवस-रात्र करून यशस्वी केल्या. लागलीच अॅथलेटिक्स संघाला मेंगलोरला पाठविले आहे. संघात तुकाराम मुंढे , माऊली वैरोळे ,नागनाथ नागरवाड ,अनिल हेमनार ,नारायण शेळके ,जहूर मोमीन ,श्रीनिवास शेळके ,सचिन लच्छेवार ,बोंबले छगन ,निवृत्ती गुडेवाड ,विष्णू लव्हाळे यांचा समावेश आहे. संघ व्यवस्थापक म्हणून



प्रो.डॉ. गंगाधर तोगरे व मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. विक्रम चित्ते आहेत. संघाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले ,प्र.कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन ,क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार डॉ. बळीराम लाड, जी.बी.मदने, मुजीब हसन ,संजयसिंह ठाकूर , शिवाजी हंबर्डे ,रतनसिंहआदीनी शुभेच्छा दिल्या.